Jr.No.41012
UGC Approved Refereed Journal
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

VIDYAWARTA®

SPECIAL ISSUE January 2019

स्थानिक इतिहास लेखन

अतिथि संपादक

डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव
प्राचार्य
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)

डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे
इतिहास विभाग प्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.41012
Vidyawarta ®
January 2019
Special Issue

Special Issue January 2019

Vidyawarta™

International Multilingual Research Journal

आबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचलित

बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव,

ता.आंबेगाव, जि.पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत

'स्थानिक इतिहास लेखन'

या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा

❑ अतिथी संपादक ❑

डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव

प्राचार्य

बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव जि.पुणे

डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे

इतिहास विभाग प्रमुख

बी.डी.काळे. महाविद्यालय घोडेगाव,ता.आंबेगाव, जि.पुणे

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

|| Index ||

01) A Marvelous Jyotirlinga... || 10
Dr. B.K. Shep

02) The Dabhol port Trades in 17th century || 12
Dr. Meenakshi Tiwari

03) Contribution of British Raj to the development of Thane district in ... || 16
Dr. Dilip Shankarrao Telang

04) Social and Cultural Contribution of Warkari Sect || 18
Dr. Swarali Chandrakant Kulkarni

05) THE ANTIQUITY OF PUNE || 22
Dr. Padmakar P. Prabhune

06) स्थानिक इतिहास लेखनाचे सामाजिक व राजकीय महत्त्व || 25
प्रा.डॉ. एच. एन. जमाले

07) कोटमदरा गावातील सामामिक, धार्मिक, आर्थिक, जीवन ... || 27
महेश दामू कोकणे

08) तरडे गावाचा सामाजिक व ऐतिहासिक आढावा || 30
डॉ. अंबादास मंजुळकर

09) स्वातंत्र्यसैनिक प्रेमाताई कंटक || 33
डॉ. भूषण गोविंद फडतरे

10) पाचोरा तालुक्यातील स्थापत्य आणि कला || 36
मंजुश्री आप्पासाहेब जाधव

11) स्थानिक इतिहास – पुणतांबा गाव || 40
प्रा. सदाफळ एन. बी.

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

12) संत बहिणाबाईचे माहेर : देवगाव (रंगारी)
प्रा डॉ. कृष्णा मालकर || 41

13) उरुळी कांचन मधील निसर्गोपचार आश्रमाचा इतिहास
प्रा. अमोल पोपट बोत्रे || 45

14) पश्चिम महाराष्ट्रातील नागरी भागातील दलित महिलांचा राजकीय दर्जा...
डॉ. बाळासाहेब निवृत्ती कर्पे || 47

15) आदिवासी ताराणहार सावकारशाहीचा कर्दनकाळ होन्या केंगले...
प्रा.संपत मारूती ब्रम्हांडे || 50

16) श्री गणेश मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास
प्रा. डॉ. गोर्डे विलास सोमा || 53

17) नांदेड जिल्ह्यातील खाकेश्वर मठसंस्थान, कासराळी
प्रा. डॉ. सोमनाथ लक्ष्मण गुंजकर || 57

18) थापलिंग व धामणीचा खंडोबा
प्रा.बी.के.सांगळे, डॉ.जाधव संतोष हनुमंत || 59

19) जंजिरा संस्थानचे विलीनीकरण एक ऐतिहासिक घटना
प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन || 62

20) भुलेश्वर मंदिराचे स्थापत्य व रचना
डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव || 67

21) प्रादेशिक इतिहास संशोधन सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास
प्रा.चांगुणा विठठ्ल कदम || 70

22) पळशी गावातील वाडे व मंदीरे
प्रा. काकडे बी. जे. || 72

23) राहाता तालुक्यातील गोगलगावचा इतिहास
महेश वसंत कुलकर्णी || 75

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

24) अकोले तालुक्यातील आदिवासी भागातील पर्यटन स्थळे
प्रा. काकडे लहू बबन || 77

25) श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा इतिहास
डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ || 81

26) लोणावळा :स्थानिक ऐतिहसिक पार्श्वभूमी, पर्यटन स्थळे व सामाजिक संस्थांची माहिती
प्रा. डॉ.संजय एस. लांडगे || 84

27) पर्यटनास चालना देणारा – अंबाजोगाईया नगरीचा ऐतिहासीक वारसा
डॉ. मुकुंद अरविंद देवर्षी || 89

28) कोल्हार भगवती गाव आणि गावातील धार्मिक स्थळांचे अवलोकन
प्रा. पंडुरे लतिका हिरालाल || 95

29) कान्हेश्वर शिवमंदीर एक अभ्यास
डॉ. पिंपळपल्ले राजाराम रामा || 99

30) शेवगाव तालुक्याचा स्थानिक इतिहास
प्रा. संदिप नामदेव मिरे || 101

31) फलटणचे ग्रामदैवत : जब्रेश्वर मंदिर–एक अभ्यास
प्रा.डॉ.संतोष तुकाराम कदम || 105

32) किसन वीर एक लोकसंग्रही नेतृत्व
प्रा.डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत || 108

33) वैद्यनाथ मंदिरस्थापत्य : एक अभ्यास
प्रा. डॉ. शेप बाबासाहेब, श्री. मुंडे दत्तात्रय || 112

34) मोराची चिंचोली– एक पर्यटन स्थळ
प्रा. शिल्पा शेटे || 115

35) धर्मवीरगड (बहादूरगड) एक भुईकोट किल्ला ऐतिहासिक वारसा
प्रा. शोभा बबन वाईकर || 118

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

36) १९४२ ते १९६० या काळातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कॉम्रेड ...
प्रा. विधाटे गणेश शंकर || 120

37) कोपरगांवातील पेशव्यांचे वाडे
प्रा. झरेकर रमेश सोनू || 124

38) प्राचीन बागलाणची ऐतिहासिक पार्श्वभूमी
प्रा.संदिप भामरे || 126

39) प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात तेर चे महत्व
डॉ शेख अब्दुलसमद बादशहा || 128

40) कल्याणातील ऐतिहासिक वास्तुस्थापत्य कला
लोखंडे चारुशिला उत्तम शशिकला || 130

41) ऐतिहासिक पर्यटन भोर
_प्राचार्य डॉ. आर. व्ही ढेरे || 137

42) देगलूर तालुक्यातील नरंगल येथील कलात्मक मुर्तिशिल्पे
डॉ. मारोती पोमा चव्हाण || 141

43) संग्रामदुर्ग किल्ल्याचा इतिहास
प्रा. विकास मुकुंद देशमुख || 146

44) स्थानिक इतिहासलेखनाची आवश्यकता
डॉ. लहू कचरु गायकवाड || 148

45) प्लेगमुळे वसईत वसलेले गोखिवरे गांव
Dr. Afegine Augustine Tuscano || 153

46) सिन्नर आणि पेशवेकालीन दुष्काळ ...
अंजली वसंतकुमार सोईतकर || 158

47) नागपुर शहरातील भोसल्यांचे महत्वपूर्ण राजवाडे, त्यांचा इतिहास व स्थापत्यकला...
श्री. संदिप मारोती महाजन || 162

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

48) बारामतीनगरपरिषदेच्या माध्यमातून झालेला अस्पृशोद्धार व भंगीमुक्तीचा इतिहास || 166
प्रा. सुनिल सुखदेव लोखंडे

49) मध्ययुगीन गोवळकोट व चिपळूणचा स्थानिक इतिहास || 168
प्रा. विकास माधवराव मेहेंदळे

50) ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाची सुवर्णमहोत्सवी खडतर वाटचाल : एक आढावा || 171
सौ अरुणा रवींद्र वाघोले

51) सातारा जिल्ह्याचा स्थानिक इतिहास || 174
प्रा. शिल्पा कुलकर्णी

52) प्राचीनतम भोसरी || 176
सौ. श्रेया संजीव दाणी

53) छत्रपती राजाराम महाराजांचे प्रशासकीय योगदान: एक ऐतिहासिक अवलोकन || 179
नरेंद्र धावजी पाटील

54) छत्रपती राजाराम महाराजांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सुधारणातील योगदान || 182
नरेंद्र धावजी पाटील

55) शेतकऱ्यांच्या परिस्थितीची जाण असलेले नेतृत्व:- मा.यशवंतरावजी गडाख पाटील || 186
प्रा.डॉ. सोनवणे आर. आर.

56) दौंड तालुक्यातील मध्ययुगिन ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास || 189
प्रा. विकास भानुदास टकले

57) पेडगावच्या भूईकोटचा किल्ला : बहादूरगड || 191
डॉ. साळे मीना चंद्रभान

58) सिध्देश्वर मंदिराचा स्थानिक इतिहास || 193
प्रा. चौधरी गोपाल विश्वनाथ

59) सविनय कायदेभंग जनआंदोलनामर्धाल पुणे जिल्हयातील शेतक यांचा सहभाग || 195
भामे गणेश पंढरीनाथ

60) महाराष्ट्राच्या भक्ती परंपरेतील वारकरी संप्रदायाचे वेगळेपण – || 198
प्रा.डॉ. विकास लक्ष्मण कदम

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.41012
Vidyawarta ®
January 2019
Special Issue

21

प्रादेशिक इतिहास संशोधन सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास

प्रा.चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग,
बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव

प्रास्ताविक :

संशोधन हा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून बुदिधनिष्ठ व व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न असतो का? कसे?काय? घडले, या प्रश्नांची तर्कशुध्द उत्तरे मिळण्याची शक्यता वाढावी याच उददेशाने संशोधन पध्दतीचा विकास झाला. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने इतिहास संशोधन ही संकल्पना रूढ झाली आहे. इतिहास संशोध नही एक सतत चालू राहणारी प्रक्रिया ठरते. जोपर्यंत भूतकाळ स्पष्टपणे पुराव्यांच्या आधारे रेखाटता येणार नाही तोपर्यंत संशोधन ही अविरतपणे चालू राहणारी प्रक्रिया आहे.

स्थानिक संशोधनाचे महत्व:

आजच्या काळात मोठया स्थानिक इतिहासाचे संशोधन होऊन सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया संशोधनापासुन वंचित राहिलेला मोठा इतिहास संशोधकांसमोर येणे गरजेचे आहे. प्रादेशिक साहित्य संशोधन हे संशोधकांच्या समोर मोठे आव्हान आहे हे लक्षात घ्यावे लागते.प्रदेशांच्या इतिहासाची आवश्यकता प्रतिपादन करताना प्रा.रा.वि.ओतूरकर अशी मीमांसा करतात की, "साने गुरूजींचे आंतरभारतीचे स्वप्न साकार करावयाचे असल्यास केवळ भारतातील भाषा भगिनींचीच ओळख करून घेणे पुरेसे होणार नाही. तर त्या त्या प्रदेशांच्या इतिहासाचे स्वतंत्रपणे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे".[१] एखाद्या प्रदेशाचा इतिहास जाणुन घेण्यास त्या प्रदेशाची अस्मिता काय आहे याचे आकलन झाले पाहिजे. प्रत्येक प्रांतियाने आपापल्या परीने स्वतंत्र रीतीने करून घेतले पाहिजे. या दृष्टिने स्थानिक संशोधनाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे.

स्थानिक इतिहासाचा अर्थ–

स्थानिक इतिहासाचा दृष्टिकोन हा आधुनिक काळातील असुन तो भौगोलिक स्थानाच्या संदर्भात दर्शविला जातो. या स्थानिक इतिहासाच्या सिध्दांतामध्ये विशिष्ट ठिकाणच्या सामाजिक व सांस्कृतिक पैलुंचा अभ्यास केला जातो. स्थानिक इतिहासाच्या सिध्दांतामध्ये मौखिक इतिहासाला अधिक महत्व दिले जाते. स्थानिक इतिहासात समाज आणि समाजातील घटना, समूह, ऐतिहासिक वाडे, किल्ले, इ.चा आढावा घेतला जातो. यासंदर्भात मांडणी करताना प्रो. जी. जे. रेनियर असे अधोरेखित करतात की, "History is a story of men living in societies"[२].

स्थानिक इतिहास लेखनाची सुरूवात–

स्थानिक इतिहास लेखनाची सुरूवात ही सर्वप्रथम इंग्लंडमध्ये १८ व्या शतकात झाली. तर भारतात इंग्लंडच्या धर्तीवर स्थानिक इतिहास लेखनाला व शिकवणुकीला सुरूवात झाली. भुतकाळात घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास हा विविध दृष्टिकोनातून केला जातो. या विविध दृष्टिकोनातून ऐतिहासिक घटनांचा अभ्यास केल्यामुळे इतिहासाचा योग्य मतितार्थ मांडता येतो. या इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनातून इतिहास लेखनाचे स्वरूप ठरत जाते. आधुनिक काळात इतिहास अभ्यासाचे अनेक दृष्टिकोन उदयाला आले. त्यामध्ये साम्राज्यवादी, पौर्वात्यवादी, राष्ट्रवादी नवमार्क्सवादी दृष्टिकोनांचा समावेश होतो. या सिद्धांताबरोबर स्थानिक इतिहास लेखनाचा सिद्धांतही उदयाला आला. इतिहासाची मर्यादा पुर्वी साहित्य, तत्वज्ञान, राज्यशास्त्र या विषयांशी 'संबंधित होती. परंतु काळाच्या ओघात या परिस्थितीत बदल होऊन मानवाच्या हालचालींशी निगडीत अशा सर्वच बाबींचा इतिहासामध्ये ढोबळमानाने समावेश होतो. थोडक्यात "समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीच्या सर्व हालचाली हा इतिहासाच्या व्याप्तीचा विषय बनतो".[३]

संशोधनाची उदिदष्टे–

१. संशोधन प्रक्रिया समजून घेणे.

२. प्रादेशिक इतिहास संशोधनाचा अभ्यास करणे.
३. ऐतिहासिक दृष्टिकोनातून प्रदेशाचे महत्व जाणून घेणे.
४. प्रादेशिक सांस्कृतिक प्रदेशाचे महत्व शोधणे.
५. सामाजिक परंपरांच्या दृष्टिने अवलोकन करणे.
६. वर्तमानकाळाशी सांगड घालून तुलनात्मक मागोवा घेणे.
७. स्थानिक इतिहास लेखनाच्या अनुषंगाने गिरवली गावाचा सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास करणे.

गिरवली नावाची उत्पत्ती–

गिरी म्हणजे पर्वत व वली म्हणजे वलय अर्थातच पर्वतांचे वलय लाभलेले गाव म्हणजे गिरवली. अशी उत्पत्ती सांगण्यात येते. या गावामध्ये अनेक जातीधर्माचे, पंथाचे लोक मोठया प्रमाणावर राहतात. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असुन जोडव्यवसाय म्हणून पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इ. व्यवसाय करतात.गावची लोकसंख्या २००० च्या आसपास असून गावातील साक्षरतेचे प्रमाण ७५ टक्के इतके असून स्त्री साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.

या गावाचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे भारत संचार निगम लिमिटेड या कंपनीचे केंद्र डोंगरावर कार्यरत आहे त्याचबरोबर आयुका ही आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची भव्य दुर्बिण केंद्र डोंगरमाथ्यावर आहे.या दुर्बिण केंद्राच्या परिसरातच प्राचीन शिवमंदिर आजही जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. या शिवलिंगाची महती अशी सांगितली जाते की, अवर्षणजन्य परिस्थितीत शिवलिंगाला जलाभिषेक केल्यावर पर्जन्यवृष्टी होते.श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी येथे उत्सव साजरा केला जातो.

धार्मिक व सांस्कृतिक दृष्टिने या गावात भैरवनाथ, कानिफनाथ, महादेव, हनुमान, श्रीदत्त, श्रीराम, विठ्ठल रूक्मिणी, मुक्ताबाई इ. देवतांची मंदिरे आजही अस्तित्वात आहेत.त्याचबरोबर ह.भ.प. पाणवलीकर महाराज यांच्या हस्ते भैरवनाथ मंदिरातील मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.तसेच या मुर्तीच्या प्रतिष्ठापनेला आज रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत.

निष्कर्ष–

१. स्थानिक इतिहास लेखन हा इतिहास लेखन शास्त्रातील एक महत्वपूर्ण प्रवाह आहे.
२. गिरवली गावातील सामाजिक जीवन वैशिष्यपूर्ण दिसून येते.
३. गिरवली गावाला सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे.
४. या गावातील मंदिर स्थापत्य हे कलात्मक असलेले दिसून येतात.

संदर्भ व टीपा–

१. रा.वि. ओतूरकर,इतिहासाच्या अभ्यासातील नवीन गरजा, शं.द.जावडेकर, व इतर(संपा.), नवभारत, दी प्राज्ञ प्रेस वाई, वर्ष ७, अंक १, ऑक्टोबर १९५३.पृ.०७.
२. अरूणा मोरे व इतर (संपा.), इतिहासाची ओळख राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१५, पृ३६.
३. बी.एन.सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००२, पृ२६
४. कित्ता, पृ. २५.
५. ह.भ.प. पाणवलीकर महाराज यांची मुलाखत.

❑❑❑